# अपघातात डोक्याला गंभीर दुखापतीमुळे वर्षभरात साठ दुचाकीस्वारांचा मृत्यू

## हेल्मेट जनजागृतीसाठी उद्या दुचाकी फेरी

प्रतिनिधी, पुणे

**शहरात रस्ते** अपघातात दुचाकीस्वार मृत्युमुखी पडण्याची संख्या वाढत आहे. दुचाकीस्वारांनी हेल्मेटचा वापर केल्यास गंभीर स्वरूपाची दुखापत टळेल. गेल्या वर्षी साठ दुचाकीस्वारांचा मृत्यू डोक्याला गंभीर इजा होऊन झाला. या पार्श्वभूमीवर पुणे पोलिसांकडून येत्या रविवारी (१५ जानेवारी) शहरातून दुचाकीस्वारांची फेरी काढण्यात येणार आहे. हेल्मेट जनजागृतीसाठी ही फेरी काढण्यात येणार आहे, अशी माहिती पोलीस आयुक्त रश्मी शुक्ला यांनी शुक्रवारी दिली.

पुणे पोलिसांकडून ९ ते २३ जानेवारी याकालावधीत रस्ता सुरक्षा अभियान-२०१७ राबवण्यात येत आहे. त्याअंतर्गत वाहतूक शाखेकडून वाहनचालकांमध्ये जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम राबवण्यात येत आहे. यंदाच्या वर्षी रस्ता सुरक्षा अभियानाचे ब्रीदवाक्य 'आपण सुरक्षित तर कुटुंब सुरक्षित! रस्त्यावर सावध रहा!', असे आहे. पुणे शहरात रस्ते अपघातात बळी पडणाऱ्या वाहनचालकांची संख्या वाढत आहे. हेल्मेट परिधान केल्यास दुचाकीस्वारांना गंभीर स्वरूपाची दुखापत होणार नाही. त्यामुळे पोलिसांकडून उद्या (१५ जानेवारी) शहरातून दुचाकी वाहनफेरी काढण्यात येणार आहे, असे पोलीस आयुक्त शुक्ला यांनी सांगितले.

याप्रसंगी फिनोलेक्स उद्योगसमूह आणि मुकुल माधव संस्थेच्या संचालक रितू छाब्रिया, विक्री आणि विपणन अध्यक्ष नितीन कुलकर्णी, गल्फ ऑईल लुब्रिकंट्सचे चिटणीस विनायक जोशी तसेच सहपोलीस आयुक्त सुनील रामानंद, वाहतूक शाखेच्या पोलीस उपायुक्त कल्पना बारावकर उपस्थित होत्या.

शुक्ला म्हणाल्या की, शिवाजीनगर पोलीस मुख्यालयातून सकाळी सातच्या सुमारास दुचाकी फेरीचा प्रारंभ होईल. या फेरीत एक हजार नागरिक तसेच पोलीस सहभागी होणार आहेत. शहराच्या वेगवेगळ्या भागातून ही फेरी जाणार आहे.

## सोळाशे पोलिसांना हेल्मेटचे वाटप

फिनोलेक्स आणि गल्फ ऑईल या उद्योगसमूहांकडून सोळाशे पोलिसांना हेल्मेटचे वाटप करण्यात येणार आहे. दुचाकीस्वारांमध्ये हेल्मेट वापरासाठी पोलिसांकडून सुरू करण्यात आलेल्या उपक्रमांना यापुढील काळात सहकार्य करण्यात येणार असल्याचे छाब्रिया यांनी सांगितले.